
देश विदेशाच्या जीवजंतूंच्या लोककथा

# कावळा व ससाणा यांच्यात वैर का



देश विदेशाच्या जीवजंतूंच्या लोककथा

# कावळा व ससाणा यांच्यात वैर का

9680
गरवारे बालभवन
पुणे

ही प्राचीन लोककथा रोमानियाच्या प्राचीन संस्कृतीने प्रभावित आहे. यात कावळा आणि ससाणा यांच्यात शत्रुत्व कसं निर्माण झालं ते सांगितलं आहे. यात एक सत्य सांगितलं आहे की प्रत्येक आई आपल्या बाळाला सर्वात सुंदर समजते.


**Santhini Govindan**

*Marathi Translation*

**Madhuri Tillu**

*Illustrated By:*

**Prasonjit**



PANDA
An imprint of Unicorn Books

बऱ्याच जणांना जरूर माहिती असेल की कावळा व ससाणा यांच्यात शत्रुत्व असतं. पण पूर्वी असं नव्हतं. पूर्वी हे दोघं एकमेकांचे मित्र होते. या दोघांमध्ये शत्रुत्व कसं निर्माण झालं याबद्दलची ही कथा प्रचलित आहे.



ससाण्याशी मैत्रीला सुरुवात कावळ्याने केली होती. ससाणा एक शिकारी पक्षी होता. त्यामुळे जंगलातले अधिकांश पक्षी त्याला भिऊन रहात. जेव्हा त्यांची पिल्लं अंड्यातून निघून मोठी होत, संधी साधून तो त्यांना मटकावून टाकायचा.



एकदा एका काक दंपतीने अंडे दिले तेव्हा त्यांना आपल्या पिल्लांची काळजी वाटू लागली. ससाण्याने बरेचदा त्यांच्या पिल्लांची शिकार केली होती. कावळ्याने विचार केला की कसेही करून ससाण्याशी मैत्री केली पाहिजे.



जर ससाण्याने त्याची मैत्री स्वीकारली तर तो ससाण्यालाच आपल्या पिल्लांचा रक्षक करून आपल्या पिल्लांच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवेल.


असा विचार करून कावळा ससाण्याजवळ पोहोचला आणि त्याला आपल्या पिल्लांचा रक्षक होण्याचा आग्रह करू लागला. ससाण्याने कावळ्याचा प्रस्ताव सहर्ष स्वीकारला.



१६४०

कावळ्याने ससाण्याला अशीही विनंती केली की त्याने त्याच्या पिल्लांना आपले भक्ष्य बनवू नये. कावळ्याची ही विनंती देखील ससाण्याने मान्य केली आणि कावळ्याला विचारलं, “मी तुझ्या पिल्लांना अभयदान तर दिलं, पण मला हे सांग की मी त्यांना ओळखू कसं?”

“त्यांना ओळखणं फारच सोपं आहे,” कावळा म्हणाला, “सर्व पक्ष्यांमध्ये सर्वात सुंदर माझीच पिल्लं असतात,” ससाण्याने संमती व्यक्त केली.



त्या दिवसापासून दोघं एकमेकांचे मित्र झाले. काही दिवसांनी अंड्यातून पिल्लं निघाली. काक-दंपत्ती त्यांच्या संगोपनात लागली. एक दिवस ससाणा शिकारीला निघाला तेव्हा त्याला पुष्कळ पक्ष्यांचे सुंदर सुंदर पिल्लं घरट्यात बसलेले दिसले. ससाण्याचं मन त्या पिल्लांना खाण्यासाठी लालचावलं. पण त्याला कावळ्याला त्यानं दिलेलं वचन आठवलं आणि त्यांना काही इजा न करता तो दुसरीकडे उडून गेला. त्याने विचार केला की न जाणे त्यातली कोणती पिल्लं कावळ्याची असली तर?



9680

त्या दिवशी ससाण्याने संपूर्ण जंगल पालथं घातलं. पण त्याला एकही शिकार मिळाली नाही. त्या रात्री तो भुकेलाच राहिला. दुसऱ्या दिवशी तो पुन्हा शिकारीसाठी निघाला. पण दुर्दैवाने त्याही दिवशी त्याला शिकार मिळाली नाही. जेव्हा तिसऱ्या दिवशीही त्याला शिकार मिळाली नाही तेव्हा तो भुकेने अत्यंत व्याकुळ झाला.




शिकारीच्या शोधात तो जंगलावरून उडत असताना त्याची दृष्टी झाडावरच्या घरट्यावर पडली. त्यात कोण्या पक्ष्याची चार पिल्लं बसली होती. पिल्लं कुरुप होती म्हणून ससाण्याला वाटलं की ही पिल्लं कावळ्याची असणं शक्य नाही कारण त्यानी सांगितलं होतं की माझी पिल्लं फार सुंदर आहेत. हा विचार करुन ससाणा त्या घरट्यात शिरला आणि ती पिल्लं त्यानी मटकावून टाकली.

काही वेळानंतर कावळा आपल्या घरट्यात पोहोचला. त्याला त्याची पिल्लं दिसली नाहीत. त्यानी खाली दृष्टी टाकली तर त्याला आपल्या पिल्लांची हाडं आणि ओरबाडून टाकलेले पंख दिसले.






आपल्या पिल्लांचा असा अंत पाहून कावळा फार दुःखी झाला. तो ससाण्याला शिव्याशाप देऊ लागला.



रागाने भडकून तो ससाण्याजवळ गेला व त्याला म्हणाला, “अरे ससाण्या! केलास ना घात माझ्या बाळांचा? खाल्ले न तू त्यांना? छान मैत्री निभावलीस! अरे दुष्टा!

मी तुला माझ्या बाळांचा संरक्षक केलं पण तू मला दगा दिलास. तू कपटी आहेस! निर्दयी आहेस!

कावळ्याचं बोलणं ऐकून ससाण्याने म्हटलं, ''तू रागावला आहेस म्हणून वायफळ बडबड करतो आहेत. मला मान्य आहे की मी पिल्लं खाल्ली, पण ती तुझी नव्हती कारण तू सांगितलं होतंस की तुझी पिल्लं सर्वात सुंदर आहेत. मी जी पिल्लं खाल्ली ती सर्वात कुरुप व खूप घाणेरडी होती. त्या पिल्लांना खाल्ल्याने तर माझी तब्येत बिघडली आणि तोंडाची चव देखील!''




“अरे कपटी! तू स्वार्थी तर आहेसच, पण त्याचबरोबर महा खोटारडा पण आहेस!” त्याला शिव्या देत कावळा ओरडला, “ती माझीच पिल्लं होती. अहा! किती गोड होती माझी पिल्लं! त्यांना मारून तू चांगलं नाही केलंस. आजपासून तुझी माझी मैत्री संपली. आता मी तुझ्यावर कधीच विश्वास ठेवणार नाही. आजपासून आयुष्यभर आपण दोघे एकमेकांचे शत्रू राहू!”




9680
गरवारे बालभवन
पुणे

असे म्हणतात की तेव्हापासून आजपर्यंत कावळा व ससाण्यात वैर कायम आहे.!


■■




# Animal Folk Tales from Around the World




Available
in English, Hindi, Marathi, Bangla, Bhojpuri




Folktales

ISBN10:81-7806-261-5
ISBN978-81-7806-261-7
9 788178 062617

₹ 56

PANDA
An imprint of Unicorn Books

U 2617